मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# थकबाकीदारांचे धाबे दणाणले, वर्तमान पत्रात नावे प्रसिद्ध होणार!

## जप्ती, लिलाव टाळण्यासाठी थकीत कर भरा, महापालिकेचे आवाहन

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

आर्थिक वर्ष संपण्यास ३८ दिवस बाकी असतानाच पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या करसंकलन विभागातर्फे थकीत कर वसुलीसाठी अतिशय धडाकेबाज निर्णय घेण्यात येऊ लागले आहेत. १ लाखांच्या पुढे थकबाकी असलेल्यांची नावे वर्तमान पत्रात प्रसिद्ध केली जाणार आहेत. मालमत्ता जप्ती संदर्भात सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल केले जाणार असून रिक्षाव्दारे थकबाकीदारांची नावे जाहीर करण्याचा मोठा निर्णय कर संकलन विभागाने घेतला आहे. त्यामुळे थकबाकीदारांनी त्वरित थकीत आणि चालू कर भरून आपली कुप्रसिद्ध टाळावी. महापालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच जप्त केलेल्या मालमत्तांपैकी २४ मालमत्तांचे मुल्यांकन ठरवून लिलाव समितीसमोर नुकताच प्रस्ताव सादर करण्यात आलेला



आहे. त्यावर आठवड्याभरात मान्यतेचा निर्णय होणार आहे. पिंपरी-चिंचवड शहरात ६ लाख १५ हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. या मालमत्ता धारकांकडून कर वसुलीसाठी महापालिकेचे १७ झोन आहेत. आतापर्यंत तब्बल ७७३ कोटी रुपयांचा कर महापालिका तिजोरीत जमा झाला आहे. मात्र, १ हजार कोटी रुपयांचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख आणि त्यांची टीम झपाटून कामाला लागली आहे. २०२३-२४ हे आर्थिक वर्ष संपण्यास अवघे ३८ दिवस बाकी आहेत. त्यामुळे थकबाकी वसुलीसाठी अतिशय सुक्ष्म पध्दतीने नियोजन करण्यात आले आहे.कर वसुलीसाठी कर संकलन विभागाने आत्तापर्यंत जप्ती मोहीम, नळ कनेक्शन बंद करणे या सारख्या कठोर कारवाया सुरू असतानाच आता प्रत्येक झोनमधील बड्या थकबाकीदारांची नावे वर्तमानपत्रातून प्रसिद्ध करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करताना काढण्यात येणारे व्हिडिओ सोशल मीडियाच्या विविध प्लॅटफॉर्मवर प्रसिद्ध केले जाणार आहेत. त्याचबरोबर सद्य स्थितीत चालू कर आणि थकीत कर भरण्यासाठी महापालिकेच्या वतीने शहराच्या विविध भागांमध्ये रिक्षावर स्पीकर लावून जनजागृती केली जात आहे.

मात्र, जनजागृती करूनही आणि विशेष म्हणजे कर भरण्याची क्षमता असूनही कर भरण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या थकबाकीदारांची नावे स्पीकरव्दारे जाहीर केली जाणार आहेत. कर संकलन विभागाच्या वतीने

> **“२४ मालमत्तांचा लिलाव करण्यासाठी लिलाव समितीला प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्यावर एका आठवड्यात निर्णय घेतला जाईल. तसेच जप्त केलेल्या मालमत्तांचे मूल्यांकन ठरविण्यासाठी ५ गव्हर्मेंट व्हॅल्यूयरची नियुक्ती केली आहे. त्यामुळे आता लिलाव प्रक्रियेला वेग येणार आहे. आतापर्यंत पंधराशेपेक्षा जास्त मालमत्तांची जप्ती, नळ कनेक्शन बंद करणे अशी कारवाई करण्यात आल्या आहेत. थकबाकीदारांनी कर भरून जप्ती आणि लिलावासारखी कटू कारवाई टाळावी.**
>
> **– प्रदीप जांभळे-पाटील,**
> **अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

महापालिकेच्या इतिहासात प्रथमच थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्तीचा धडाका लावला आहे. आतापर्यंत एक हजार पेक्षा अधिक मालमत्ता जप्त केल्या आहेत. आता या जप्त केलेल्या मालमत्तांचे मूल्यांकन करण्यासाठी गव्हर्मेंट व्हॅल्यूयरची आवश्यकता होती. याबाबत अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार विहित मुदतीत ५ गव्हर्मेंट व्हॅल्यूयरचे अर्ज महापालिकेकडे आले होते. या पाचही जणांची पॅनलवर नियुक्ती करण्यात आली आहे.५ हजार पेक्षा जास्त फॉलोअर्स संख्या असणारे 'सोशल मिडिया इन्फ्लुएन्सर' आहेत. मालमत्ता कर वसुलीसाठी या 'इन्फ्लुएन्सर'चा उपयोग करण्याचा महापालिकेने निर्णय घेतला आहे. या ७६ जणांमध्ये कर भरण्या संदर्भात नागरिकांना प्रेरित करण्यासाठी रिल्स स्पर्धा घेण्यात येणार आहे. जे 'इन्फ्लुएन्सर' हटके आणि नाविन्यपूर्ण व्हिडिओ तयार करेल त्यांना कर संकलन विभागाच्या वतीने बक्षीस देण्यात येणार आहे.

# चित्रपटातून विद्यार्थ्यांचे प्रबोधन वसंत लोंढे प्रतिष्ठानचा उपक्रम

## ५०० विद्यार्थ्यांना सत्यशोधक चित्रपट मोफत दाखवण्यात आला

**। पिंपरी-चिंचवड।**

क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जीवनपट उलगडून सांगणारा, समाज प्रबोधन करणारा 'सत्यशोधक' हा चित्रपट आहे. तो पाहून शिक्षणाची प्रेरणा घ्यावी आणि उत्तुंग यश साध्य करावे, या उद्देशाने भोसरीतील महात्मा फुले जागृती शिक्षण




मंडळाच्या प्राथमिक शाळेतील ५०० विद्यार्थ्यांना वसंत (नाना) लोंढे प्रतिष्ठानच्या वतीने चित्रपट मोफत दाखवण्यात आला.यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष व ज्येष्ठ माजी नगरसेवक वसंत लोंढे, सुलोचना लोंढे, माजी नगरसेवक सुरेश तात्या म्हेत्रे, महात्मा फुले जागृती शिक्षण मंडळ चे अध्यक्ष निळकंठ लोंढे, उपाध्यक्ष विश्वनाथ लोंढे, मुख्याध्यापक मोहन वाघुले, सुलभा चव्हाण, कलाकार पायल साळुंखे, संदीप जोशी, सुहास वैद्य, प्रवीण खरडे, निर्माता प्रवीण तायडे, आप्पा बोराटे, बाळासाहेब बांगर आदी उपस्थित होते.

यावेळी निर्माता आणि कलाकार यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. निर्माता बाळासाहेब बांगर यांनी यावेळी सांगितले की, या चित्रपटाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्यापासून होते. या चित्रपटात क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा समतेचा संदेश देणारा संघर्षमय आणि त्यागमय जीवनपट दाखवण्यात आला आहे. कर्मकांडाचा विरोध करीत क्रांतिकारी लढा त्यावेळी फुले दांपत्यांनी उभारला.

# डोंगरावरील मंदिरासाठी खासदार श्रीरंग बारणे यांच्याकडून अडीच कोटींचा निधी देण्याचा संकल्प

## एक कोटींचा धनादेश सुपूर्द, काही दिवसांत दीड कोटी निधी देणार

**। पिंपरी-चिंचवड ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

भंडारा डोंगरावर नागरशैलीत आणि अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिराच्या धर्तीवर उभारण्यात येत असलेल्या जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराजांच्या मंदिरासाठी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी लोकवर्गणीतून अडीच कोटी रुपयांचा निधी देण्याचा संकल्प केला आहे. त्यापैकी एक कोटी रुपयांच्या निधींचा धनादेश भंडारा डोंगर मंदिर ट्रस्टकडे सुपूर्द करण्यात आला. तर, येत्या काही दिवसात दीड कोटी रुपयांच्या मदतीचा धनादेश सुपूर्द केला जाणार आहे.माघ शुद्ध दशमी सोहळ्यानिमित्त भंडारा डोंगरावर अखंड गाथा पारायण सोहळा संपन्न झाला. सोहळ्याच्या सांगतादिनी खासदार बारणे यांनी



एक कोटी रुपयांचा निधी ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब काशीद यांच्याकडे सुपूर्द केला. खासदार श्रीरंग बारणे म्हणाले की, भंडारा डोंगरावर भव्यदिव्य असे मंदिर उभारले जात आहे. जगद्गुरु संत तुकाराम महाराजांची चार फूट उंचीची मूर्ती ही समोरच्या बाजूला बसविण्यात येणार आहे. मंदिरात भक्तांसाठी प्रशस्त प्रदक्षिणा मार्ग असणार आहे. मंदिराच्या मंडपावर व भिंतींवर वेगवेगळ्या प्रकारचे नक्षीकाम व कोरीवकाम केलेले असणार आहे. मंदिराचे बांधकाम लोकवर्गणीतून होत आहे. मंदिरासाठी मी स्वनिधीतून काही आणि लोकवर्गणीतून अडीच कोटी रुपये निधी देण्याचा संकल्प केला आहे. त्यापैकी एक कोटी रुपयांचा धनादेश दिला आहे. उर्वरित दीड कोटी रुपयांचा निधी येत्या काही दिवसात देण्यात आहे. समाजातील दानशूर व्यक्ती, संस्थांनी पुढे येऊन मंदिराच्या बांधकामासाठी सढळ हाताने मदत करावी. जेणेकरून मंदिराचे बांधकाम लवकर पूर्ण होण्यास मदत होणार आहे. भंडारा डोंगर मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब काशीद म्हणाले, मंदिराचे ५० टक्के काम पूर्ण झाले आहे. प्रभू श्रीराम मंदिराच्या धर्तीवर मंदिराचे काम चालले आहे. खासदार श्रीरंग बारणे यांनी मंदिरासाठी अडीच कोटी रुपये निधी देण्याचा संकल्प जाहीर केला आहे. त्यापैकी एक कोटीचा निधी काल्याच्या दिवशी दिला आहे. येत्या काही दिवसात उर्वरित निधी देण्याचे जाहीर केले आहे. मागील २० वर्षांपासून खासदार बारणे यांची मंदिर कार्यासाठी वेळोवेळी मदत झाली. मंदिर विकास, रिंगरोड,जमीन आरक्षण, शासकीय निधीतून विकास कामांसाठी सक्रियपणे मदत केली. शासकीय जमीन अधिगृहण करुन विकास आराखडा राबविण्यात त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह संबंधित मंत्री, शासकीय अधिका-यांकडे पाठपुरावा केला आहे.

# डी.वाय.पाटील कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी दिली महाराजांना मानवंदना!

## ढोल ताशांच्या गजरात छत्रपती शिवरायांच्या पालखीचे पूजन

**। पिंपरी-चिंचवड ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

युवा महाराष्ट्रतर्फे पिंपरी येथील डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ़ टेक्नॉलॉजी मध्ये महानाट्य साजरीकराणातून शिवरायांना मानवंदना दिली. यावेळी युवा महाराष्ट्र कडून ‘श्री शंभो: शिवजातस्य’ हे महानाट्य सादर करण्यात आले.समारंभास कॉलेजचे प्राचार्य डॉ. ललितकुमार वाधवा, इतिहास संशोधक व मोडी लिपी अभ्यासक ब.



ही. चिंचवडे व सरसेनापती येसाजी कंक यांचे १३वे वंशज आकाश कंक यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी किल्ले शिवनेरी येथून युवा महाराष्ट्रच्या स्वयंसेवकांनी आणलेली ‘शिवज्योत’ कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण होते. कॉलेजच्या प्रांगणात ढोल ताशांच्या गजरात छत्रपती शिवरायांच्या पालखीचे पूजन करण्यात आले व महाराजांच्या पालखीची मिरवणूक काढण्यात आली. छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित अपरिचित घडामोडी व तत्कालीन जीवन प्रसंग ‘श्री शंभो: शिवजातस्य’ महानाट्याद्वारे उलगडण्याचा प्रयत्न केला. अखेरीस ब.ही.चिंचवडे यांनी इतिहासातील अपरिचित पैलूंची माहिती आपल्या शैलीत दिली व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या तसेच उपस्थित प्राध्यापकांनी कार्यक्रमाचे विशेष कौतुक केले व कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी झटणाऱ्या स्वयंसेवकांचे अभिनंदन देखील केले. कार्यक्रमास उपस्थित इन्स्टिट्यूटमधील शिक्षक वर्ग, विभागप्रमुख व प्रा.पंकज परदेशी, डॉ. पुष्पराज वारके, शेंडे सर, प्रा. गणेश पाटील, उपस्थित पालकवर्ग व विद्यार्थी या सर्वांचे आभार. मिरवणुकीत पोलीस प्रशासनाचे व कॉलेज सुरक्षा रक्षक यांचे विशेष सहकार्य लाभले.

# निवडणूक आयोगाचा राज्य सरकारला दणका

## सरकारला दणका देत १०९ अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या रद्द

पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी। लोकसभा निवडणुकीची आचारसंहित लागू होण्यापूर्वी सनदी अधिकारी आणि राज्य पोलीस दलातील अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात येत आहेत. मात्र, अनेक बदल्या करताना केंद्रीय निवडणूक आयोगाचे नियम, निकष पायदळी तुडविण्यात आल्याच्या तक्रारी होत आहेत. याबाबत निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करण्यात आल्या होत्या. तसेच अनेक अधिकाऱ्यांनी मॅटमध्ये धाव घेतली होती. या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्य सरकारला दणका देत १०९ अधिकाऱ्यांच्या बदल्या रद्द केल्या आहेत. बदल्या करताना केंद्रीय निवडणूक आयोगाचे नियम, निकष यांचे पालन करण्यात आले नसल्याच्या तक्रारी आयोगाकडे दाखल झाल्या होत्या. तसेच अनेक पोलीस अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरणाकडे (मॅट) धाव घेतली होती.या




पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे म्हणाले, 'लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बदल्या करताना नियम, निकषांचे पालन न केल्याने अनेक अधिकारी मॅटमध्ये गेले होते. याबाबत मॅटने केंद्रीय निवडणूक आयोगाला निवडणुकीच्या अनुषंगाने बदली करतानाचे नियम, निकष तपासून पाहण्याची विनंती केली होती. अशी २२५ प्रकरणे आयोगाकडे दाखल झाली होती.

या प्रकरणांची छाननी केल्यानंतर १०९ बदल्या नियम, निकषानुसार झाल्या नसल्याचे निदर्शनास आले. ही बाब मॅट आणि राज्य शासनाला कळविण्यात आली आहे. त्यामुळे या प्रकरणांत नियमाप्रमाणे कार्यवाही करावी लागणार आहे.' पुण्याच्या जिल्हाधिकारीपदी सुहास दिवसे यांची ७ फेब्रुवारीला नियुक्ती करण्यात आली. मात्र, गेल्या चार वर्षांपासून दिवसे हे पुण्यात महत्त्वाच्या पदावर कार्यरत आहेत. निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बदल्यांसाठी ठरवून दिलेल्या नियमांचे उल्लंघन झाल्याचा दावा करत डॉ. दिवसे यांची बदली रद्द करावी, अशी मागणी आम आदमी पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष, सुराज्य संघर्ष समितीचे विजय कुंभार यांनी आयोगाकडे केली होती. त्यावर केंद्रीय निवडणूक आयोगाने खुलासा केला आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बदल्यांचे निकष ठरवून दिले आहेत. त्यानुसार जिल्ह्यात तीन वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळ असलेल्या अधिकाऱ्यांची जिल्ह्याबाहेर बदली करावी, असे सांगण्यात आले आहे. तीन वर्षांपेक्षा अधिक काळ जिल्ह्यात झाला असेल, मात्र संबंधित अधिकारी निवडणुकीशी संबंधित काम करणार नसेल, तर तो जिल्ह्यात राहू शकतो. मात्र, भविष्यात अशा अधिकाऱ्याकडे निवडणुकीशी संबंधित काम देण्यात येऊ नये, अशी अट आयोगाने घातली आहे. दिवसे हे जुलै २०२० ते ऑगस्ट २०२२ या कालावधीत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) महानगर आयुक्त होते. त्यानंतर सप्टेंबर २०२२ ते ७ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत पुण्यात राज्याचे क्रीडा आयुक्त म्हणून दिवसे यांची नियुक्ती झाली होती. ७ फेब्रुवारीला पुण्याचे जिल्हाधिकारी म्हणून त्यांची नियुक्ती झाली. तीन वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळ जिल्ह्यात असलेल्या अधिकाऱ्यांची जिल्ह्याबाहेर बदली करण्यात यावी, असा निवडणूक आयोगाचा नियम आहे. दिवसे यांच्या बदलीने या नियमाचा भंग झाला आहे किंवा निवडणूक आयोगाचा नियम डावलून दिवसे यांची नियुक्ती करण्यात आल्याचा आरोप कुंभार यांनी केला होता.

### निवडणूक आयोगाकडे तक्रार

» याबाबत खुलासा करताना केंद्रीय निवडणूक आयोगाचे महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे म्हणाले, 'डॉ. दिवसे हे राज्याचे क्रीडा आयुक्त म्हणून कार्यरत होते. हे पद राज्यस्तरावरील असून मुख्यालय पुण्यात असले, तरी कार्यक्षेत्र राज्य होते. त्यामुळे डॉ. दिवसे यांचे कार्यक्षेत्र पुणे जिल्हा असे गणले जात नव्हते. त्यामुळे त्यांची नियमाप्रमाणे जिल्हाधिकारीपदी नियुक्ती झाली आहे.' लोकसभा निवडणुकीची आचारसंहित लागू होण्यापूर्वी सनदी अधिकारी आणि राज्य पोलीस दलातील अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात येत आहेत. मात्र, अनेक बदल्या करताना आयोगाचे नियम, निकष पायदळी तुडविण्यात आल्याच्या तक्रारी होत आहेत. निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करण्यात आल्या होत्या.

# विद्यापीठ प्रशासनाने आठ दिवसांत कार्यवाही करावी

## विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमित ठाकरे यांच्या नेतृत्त्वाखाली मूक मोर्चा

पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी। शहरातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांबाबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठावर मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाची दखल कुलगुरूसुरेश गोसावी यांनी घेतली आहे. आम्ही शांततेच्या मार्गाने आज मोर्चा काढला आहे. जर येत्या आठ दिवसांत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नाही. तर आम्ही आमच्या



पद्धतीने त्यांना उत्तर देऊ, असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमित ठाकरे यांनी विद्यापीठ प्रशासनाला दिला. शहरातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नाबाबत सेनापती बापट रोड ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठावर मनसेचे विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमित ठाकरे यांच्या नेतृत्त्वाखाली मूक मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात शर्मिला ठाकरे, मनसेचे नेते माजी आमदार बाळा नांदगावकर, मनसे नेते राजेंद्र वागस्कर, पुणे मनसे शहराध्यक्ष साईनाथ बाबर, प्रवक्ते गजानन काळे, मनसेचे नेते वसंत मोरे यांच्यासह विद्यार्थी आणि मनसैनिक हजारोंच्या संख्येने सहभागी झाले आहेत. तर विविध मागण्यांचे निवेदन कुलगुरू सुरेश गोसावी यांना अमित ठाकरे यांनी दिले. त्यावेळी त्यांची जवळपास तासभर चर्चा झाल्यानंतर त्यांनी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींसोबत संवाद देखील साधला.यावेळी अमित ठाकरे म्हणाले की, सावित्री बाई पुणे विद्यापीठाची स्थापना १९५० मध्ये झाली.जवळपास ७५ वर्षांचा कालावधी उलटून गेला आहे. तेव्हापासून आजअखेरपर्यंत आपण मेसमध्ये चांगल्या प्रकारचे जेवण मिळत नाही, त्यावर भांडत आहोत आणि त्यामध्ये विद्यापीठ प्रशासन सुधारणा करीत नाही. याबाबत खंत वाटते. तसेच जगभरातील विद्यार्थी या विद्यापीठामध्ये शिक्षण घेण्यासाठी येतात.

# महामेट्रोच्या निर्णयाचा प्रवाशांना बसणार फटका

## सध्याची मेट्रोची दैनंदिन प्रवासी संख्या सुमारे ५५ हजार

**पुणे ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पुणे मेट्रोच्या प्रवाशांना आता परतीच्या प्रवासाची (रिटर्न) तिकीट सेवा बंद होणार आहे. महामेट्रोकडून १ मार्चपासून हा नवीन नियम लागू केला जाणार आहे. यामुळे प्रवाशांना प्रवास करताना एकदाच परतीचे तिकीट काढण्याऐवजी आता जाताना आणि येताना वेगवेगळे तिकीट काढावे लागेल. त्यामुळे या निर्णयाचा फटका प्रवाशांना बसणार आहे. सध्या पुणे मेट्रोची सेवा पहिल्या टप्प्यातील मार्गिका १ -पिंपरी चिंचवड महापालिका ते जिल्हा न्यायालय आणि मार्गिका २ – वनाझ ते रुबी हॉल अशा एकूण २४ किलोमीटर मार्गावर प्रवासी सेवा सुरु आहे. उर्वरित ९ किलोमीटर मार्गाचे काम पूर्णत्वाकडे आले असून लवकरच पुणे मेट्रोची पहिल्या टप्प्यातील संपूर्ण मार्गिका प्रवाशांसाठी खुली करण्यात येणार आहे. सध्याची मेट्रोची दैनंदिन प्रवासी संख्या सुमारे ५५ हजार आहे. ही प्रवासी संख्या कमी असल्याने ती वाढविण्यासाठी महामेट्रोकडून सातत्याने पावले उचलली जात आहे. संपूर्ण मेट्रो मार्गिका खुल्या झाल्यानंतर प्रवाशांची संख्या वाढेल, असा महामेट्रोचा अंदाज आहे. प्रत्येक मेट्रो स्थानकावर तिकीट खिडक्यांवर सकाळी आणि सायंकाळी गर्दी दिसून येते. यामुळे मेट्रो प्रवाशांना मेट्रोचे ॲप, व्हॉट्सॲप क्रमांक, एटीव्हीएम यंत्राच्या माध्यमातून तिकीट काढण्याची सुविधाही देण्यात आली आहे. याचबरोबर प्रवाशांचा वेळ वाचावा म्हणून परतीच्या तिकिटाची सुविधाही महामेट्रोने उपलब्ध करून दिली होती. मात्र, आता महामेट्रो प्रशासनाने परतीच्या तिकिटाची सुविधा १ मार्चपासून बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे परतीचा प्रवास करणाऱ्या प्रवाशांना जाताना आणि येताना असे दोन वेळा तिकीट काढावे लागणार आहे. यामुळे त्यांचा वेळ जाणार आहे. याबद्दल प्रवाशांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.दरम्यान, याआधी महामेट्रोने प्रवाशांसाठी तिकीट काढून स्थानकात प्रवेश केल्यानंतर २० मिनिटांत प्रवास सुरू करणे बंधनकारक केले होते. अनेक जण तिकीट काढून मेट्रो स्थानकात गेल्यानंतर आतमध्ये निवांत बसतात. त्यामुळे दैनंदिन प्रवाशांची विनाकारण गैरसोय होते. यावर उपाय म्हणून महामेट्रोने प्रवाशांसाठी तिकीट काढून स्थानकात प्रवेश केल्यानंतर २० मिनिटांत प्रवास सुरू करणे बंधनकारक करण्याचे पाऊल उचलले. याचबरोबर तिकीट काढून स्थानकात प्रवेश केल्यानंतर प्रवास संपवून प्रवाशाने ९० मिनिटांत बाहेर पडणे बंधनकारक केले.




### तिकीट खिडक्यांवर सकाळी आणि सायंकाळी गर्दी

**» या निर्णयाचा फटका प्रवाशांना बसणार आहे. सध्या पुणे मेट्रोची सेवा पहिल्या टप्प्यातील मार्गिका १ –पिंपरी चिंचवड महापालिका ते जिल्हा न्यायालय आणि मार्गिका २ – वनाझ ते रुबी हॉल अशा एकूण २४ किलोमीटर मार्गावर प्रवासी सेवा सुरु आहे. उर्वरित ९ किलोमीटर मार्गाचे काम पूर्णत्वाकडे आले असून लवकरच पुणे मेट्रोची पहिल्या टप्प्यातील संपूर्ण मार्गिका प्रवाशांसाठी खुली करण्यात येणार आहे. सध्याची मेट्रोची दैनंदिन प्रवासी संख्या सुमारे ५५ हजार आहे. ही प्रवासी संख्या कमी असल्याने ती वाढविण्यासाठी महामेट्रोकडून सातत्याने पावले उचलली जात आहे. संपूर्ण मेट्रो मार्गिका खुल्या झाल्यानंतर प्रवाशांची संख्या वाढेल, असा महामेट्रोचा अंदाज आहे.प्रत्येक मेट्रो स्थानकावर तिकीट खिडक्यांवर सकाळी आणि सायंकाळी गर्दी दिसून येते.**

# पुण्यात रविवारी ४०० ठिकाणी होणार ई-कचरा गोळा

## संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी यांनी केले पुणेकरांना 'हे' आवाहन

**पुणे ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

संत गाडगेबाबा जयंती निमित्त महापालिकेच्यावतीने 'पेहेल-२०२४' या उपक्रमाअंतर्गत विशेष अभियान हाती घेण्यात आले आहे. रविवारपासून शहरात अभियानाची अंमलबजावणी होणार असून त्याअंतर्गत ई-कचरा आणि प्लास्टिकचे संकलन केले जाणार आहे. त्यासाठी विविध ठिकाणी चारशेहून अधिक केंद्र उभारली जाणार आहेत. सकाळी नऊ ते दुपारी एक या कालावधीत या प्रकारच्या कचऱ्याचे संकलन केले जाणार आहे.संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त महापालिकेच्या वतीने दरवर्षी विविध पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात येतात. यामध्ये स्वच्छता मोहीम, कचरा वर्गीकरण जनजागृती, वारंवार कचरा टाकली जाणारी ठिकाणे नष्ट करणे असे उपक्रम हाती घेण्यात येतात. यंदाही पेहेल-२०२४ या उपक्रमाअंतर्गत ई-कचरा आणि प्लास्टिकचे संकलन केले जाणार आहे. कमिन्स इंडिया, केपीआयटी आणि पर्यावरण क्षेत्रातील स्थानिक सामाजिक संस्थांच्या मदतीने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.या अभियानाअंतर्गत रविवारी (२५ फेब्रुवारी) संपूर्ण शहरात चारशेहून अधिक कचरा संकलन केंद्र उभारण्यात येणार आहेत. तर शनिवार (२४ फेब्रुवारी) शाळा-महाविद्यालयांमध्ये ई-कचरा आणि प्लास्टिकचे संकलन केले जाणार आहे. कचरा जनजागृती संदर्भातही विविध कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहेत. अभियानाअंतर्गत संकलित झालेल्या वस्तूंची दुरुस्ती शक्य असल्यास केली जाणार असून गरजू विद्यार्थी, शैक्षणिक संस्थांना त्या भेट दिल्या जाणार आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नोंदणीकृत केलेल्या संस्थांना उर्वरित ई-कचरा आणि प्लास्टिकचा कचरा दिला जाणार असून या संस्थांद्वारे कचऱ्यावर शास्त्रीय पद्धतीने पुनर्प्रक्रिया केली जाणार आहे. संकलित केंद्रांची यादी महापालिकेच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली आहे.त्यासाठी विविध ठिकाणी चारशेहून अधिक केंद्र उभारली जाणार आहेत. सकाळी नऊ ते दुपारी एक या कालावधीत या प्रकारच्या कचऱ्याचे संकलन केले जाणार आहे.संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त महापालिकेच्या वतीने दरवर्षी विविध पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात येतात. यामध्ये स्वच्छता मोहीम, कचरा वर्गीकरण जनजागृती, वारंवार कचरा टाकली जाणारी ठिकाणे नष्ट करणे असे उपक्रम हाती घेण्यात येतात. यंदाही पेहेल-२०२४ या उपक्रमाअंतर्गत ई-कचरा आणि प्लास्टिकचे संकलन केले जाणार आहे.

